# ८. शिव आणि शंकर यांमधील फरक

**ब**रेच लोक शिव आणि शंकर यांना एकच मानतात, परंतु खरे पाहता या दोहोत फरक आहे. आपण **पाहिलेच असेल की, या दोघांच्या प्रतिमा वेगवेगळ्या आकाराच्या असतात. शिव परमात्म्याची प्रतिमा** अंडाकार किंवा अंगुष्ठाकार असते तर महादेव शंकराची प्रतिमा शारीरिक आकाराची असते. येथे या **दोघांचा वेगवेगळा परिचय जो परमपिता शिव परमात्म्याने स्वतः आम्हास समजावून दिला आहे आणि** त्याचा अनुभवही करवून दिला आहे तो स्पष्ट करण्यात आला आहे.

**महादेव शंकर**

१. हा ब्रह्मा आणि विष्णूप्रमाणे सूक्ष्म शरीरधारी असून त्याला 'महादेव' म्हटले जाते; परंतु याला परमात्मा म्हणता येणार नाही.

२. हा ब्रह्मा आणि विष्णू या देवतांप्रमाणे सूक्ष्म-लोकी शंकरपुरीत निवास करतो.

३. ब्रह्मा व विष्णू या देवतांप्रमाणे यालाही परमपिता शिव परमात्माच निर्माण करतो.

४. हा केवळ सृष्टीच्या महाविनाशाचे कार्य करवितो; सृष्टीची स्थापना व पालन करण्याची कर्तव्ये ही काही याची नव्हेत.

**परमपिता परमात्मा शिव**

१. हा चैतन्य ज्योतिर्बिंदू आहे. याला आपले असे कोणतेही स्थूल व सूक्ष्म शरीर नाही. हा परम-आत्मा आहे.

२. हा ब्रह्मा, विष्णू व शंकर यांच्या 'सूक्ष्म देवलोकां'च्याही पार पलीकडे असलेल्या ब्रह्मलोकात (मुक्तिधाम, परमधाम) निवास करतो.

३. हा ब्रह्मा, विष्णू व शंकर यांचा निर्माता म्हणजे 'त्रिमूर्ती' आहे.

४. हा ब्रह्माद्वारे स्थापना, शंकराद्वारे महाविनाश आणि विष्णूद्वारे विश्वाचे पालन करवून विश्वाचे कल्याण करतो.

**शिवाचा जन्मोत्सव रात्री का ?**

वास्तविक 'रात्र' हे अज्ञान, तमोगुण किंवा पापाचाराचे प्रतीक आहे. म्हणून द्वापर आणि कलियुगाच्या समयाला 'रात्र' म्हटले जाते. कलियुगाच्या अंती जेव्हा साधू, गुरू, संन्यासी, आचार्य इत्यादी सर्व माणसे पतित, दुःखी होतात आणि अज्ञान-निद्रेत झोपून राहतात, धर्माची अती ग्लानी होते आणि विशेषतः हा सारा भारत विषयविकारांमुळे वेश्यालय बनतो तेव्हा पतितपावन परमपिता परमात्मा शिव या सृष्टीवर दिव्य जन्म घेतो. म्हणून अन्य सर्वांचा जन्मोत्सव तर 'जन्म-दिन' म्हणून साजरा केला जातो परंतु **शिव परमात्म्याच्या 'जन्म-दिना'ला 'शिवरात्री'** (Birth night) म्हटले जाते. म्हणून येथे चित्रात जो कृष्णवर्ण किंवा अंधकार दाखविला गेला आहे तो अज्ञानांधकार किंवा विषयविकारांच्या रात्रीचे द्योतक आहे.

**ज्ञान-सूर्य शिव परमात्म्याच्या प्रकट होण्याने सृष्टीतील अज्ञानांधकार तसेच विकारांचा नाश**

अशा प्रकारे अवतरित होऊन ज्ञान-सूर्य परमपिता परमात्मा शिव जेव्हा ज्ञान-प्रकाश देतो तेव्हा थोड्याच काळात ज्ञानाचा प्रभाव साऱ्या विश्वात पसरतो आणि कलियुग व तमोगुणाच्या जागी जगात सत्ययुग व सत्वगुणाची स्थापना होते आणि अज्ञान-अंधकाराचा तसेच विकारांचा विनाश होतो. साऱ्या कल्पात परमपिता शिव **परमात्म्याच्या एका अलौकिक जन्माने अल्पावधीत** या सृष्टीरूपी वेश्यालयाचे रूपांतर शिवालयात होते आणि नराला श्रीनारायणपद तसेच नारीला श्रीलक्ष्मीपद प्राप्त होते. म्हणून शिवरात्री हिरे-तुल्य आहे.


# सर्व देवी-देवतांचे आणि सर्व धर्मपित्यांचे ही पिता - परमपिता परमात्मा त्रिमूर्ति-शिव

परमपिता परमात्मा 'शिव' ज्योतिर्बिंदू स्वरूप आहे. मनुष्यात्म्या प्रमाणे ते देहधारण करीत नाहीत कारण ते **अजन्मा व अभोक्ता आहेत.** तुलनेमध्ये त्यांना **'निराकार'** म्हणतात. बिन्दू असूनही ते गुणांचे सिंधू आहेत. म्हणूनच त्यांची स्मृति मंदिरे विभिन्न गुणवाचक नांवाने प्रसिध्द आहेत. सर्व धर्म संस्थापकांनी ईश्वराला अनेक प्रकाराने परंतु ज्योति - स्वरूपात मानलेले आहे. शिवबाबा सर्व देवी-देवतांचे आराध्य आहेत, ते सोबतच्या चित्रात प्रदर्शित केले आहे. म्हणून परमपिता परमात्मा **'शिव'** मनुष्य सृष्टिचे बीजरूप अर्थात रचयिता आहेत.

**'परमात्मा शिव –** ज्ञान सागर, गीता ज्ञान दाता, दिव्य चक्षुविधाता, पतितपावन, दु:खहर्ता - सुखकर्ता आहेत' मनुष्यात्म्यांना ज्ञानामृत देऊन विषय-विकार व पापापासून मुक्त करतात. **सोमनाथ, अमरनाथ, मुक्तेश्वर, पापकटेश्वर, महाकालेश्वर** आणि नेपाळमध्ये **पशुपतिनाथ** इत्यादि गुणवाचक नांवानी ज्योतिर्लिंगाची स्थापना केलेली आहे.

सृष्टिचक्रानुसार व श्रीमद्भगवद्गीतेत दिलेल्या वचनाची पूर्ति करण्यास ६६ वर्ष पूर्वे **'प्रजापिता ब्रह्मा', यांच्या वृध्द मानवी शरीरामध्ये परकाया प्रवेश करुन ईश्वरीय विश्व विद्यालयाची स्थापना केलेली आहे. आणि संपूर्ण विश्वात ईश्वरीय-ज्ञान प्रकाशाचा उजाळा देत आहेत. देश विदेशातील लाखों नर-नारी ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारी - पवित्र व निर्विकारी तसेच व्यसनमुक्त जीवन व्यतीत करीत आहेत. त्याच ईश्वरीय ज्ञान व शक्तिचे आधारे सर्व विकारांचा त्याग करून मानव मात्रास षड्रिपू व व्यसनांपासून मुक्त करून दैवी संस्कृति अर्थात आदि सनातन देवी-देवता धर्माची स्थापना करण्यास तन-मन-धनाने सहयोग देत आहेत. म्हणूनच विनम्र निवेदन आहे कि —**

**हे आमच्या प्रिय बंधू - भगिनींनो** — वर्तमान काळ दु:खदायी कलियुगाचा अंतिम चरण आहे. म्हणून आपल्या परमप्रिय परमपिता परमात्मा **'शिव बाबा'** चे अंत:करणापासून स्मरण करावे. या राजयोगामुळे आपले विकर्म वा पाप भस्म होईल तेंव्हाच आपण पवित्र बनून मुक्तिधामला (ब्रह्मलोकांत) परत जावू शकू व भविष्यात लवकरच स्वर्गीय जगांत देवी देवतांचे रूपात सुख-शांति व समृध्दि प्राप्त करु शकू.



## ईश्वरीय निमंत्रण

याच श्रृंखलेत आपल्या शहरांत **'महाशिवरात्री महोत्सवाचे'** निमित्ताने एक अलौकिक कार्यक्रम आयोजित केलेला आहे. खऱ्या अर्थाने आपण महाशिवरात्री कशी साजरी करावी ? शिव-भोलेनाथ बाबाशी आपला कोणता संबंध आहे व त्यांचेकडून वरदान कसे प्राप्त करावे ? उपवास - जागरण करण्याचा काय भावार्थ आहे ? कोणत्या प्रकारचा उपवास केल्याने भोलेनाथ शिव भगवान प्रसन्न होतो आणि वरदानाचा वर्षाव करतो ? भाग्यविधाता आपले भाग्य कसे बनवितो ? – हे सर्व आपणांस समजावून सांगण्यांत येईल.

या विशेष अलौकिक कार्यक्रमात आपण इष्टमित्र परिवारासहित सादर आमंत्रित आहात. अवश्य यावे ही विनंती.

| आंतर-राष्ट्रीय मुख्यालय | कार्यक्रम | स्थानिक सेवाकेन्द्र |
|---|---|---|
| पाण्डव भवन, माउंट आबू (राजस्थान), भारत<br>फोन : ०२९७४-२३८२६१ ते २३८२६८ | | **ब्रह्माकुमारी**<br>**४५० रविवार पेठ, कापडगंज बँकेच्या वर,**<br>**फडके हौदाजवळ, पुणे ४११००२.** |

# प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय

# महाशिवरात्री महोत्सवानिमित्त शिव भक्तांसाठी ईश्वरीय संदेश

## परमपिता शिव-परमात्म्याच्या प्रिय मुलांनों –

**परमपिता परमात्मा शिव** यांचेशी आपले आत्मियतेचे नाते आहे. म्हणून त्यांच्याशी आत्ममिलन अथवा मनोमिलन करण्यासाठी आपण आकांक्षी आहोत. त्यांचे प्रति आपली अनन्य भक्ति व श्रध्दा आहेच. परंतु त्याबरोबरच परमश्रध्देय-परमपूज्य परमपित्याशी आत्मिक नाते जोडण्यासाठी निम्नलिखित सत्य व वास्तविक माहिती आपणांस असणे आवश्यक आहे. जसे –



❖ **ज्योतिर्बिंदू शिव** - यांचे निजरूप, अनादि-अविनाशी ईश्वरी गुण-कर्म , स्वभाव आणि प्रभाव कोणता आहे ? तसेच **'शिव'** शब्दाचा अर्थ कल्याणकारी असा आहे व म्हणूनच कल्याणेश्वर या नांवाने त्यांची मंदिरें आहेत. आपण सर्व त्यांची प्रिय मुले आहोत तरी पण कल्याणापासून वंचित का आहोत बरे !

❖ **शिव**-लोक अथवा शिवधाम कोठे आहे ?

❖ शिवलिंगावर तीन आडव्या रेखा आणि मधोमध 'बिंदू'- कशाचा द्योतक आहे ?

❖ मानव-शरीरात विद्यमान अर्थात जीवात्म्याचे कोणते स्वरूप आहे ? परमात्मा शिव यांचेशी जीवात्म्याचा अनादि-अविनाशी कोणता संबंध आहे ?

❖ मनुष्यआत्म्यास - जिवा-शिवाची भेट अथवा शिवमिलन, मनोमिलन तसेच ईश्वरानुभूति सहज व सुलभतेने होऊ शकते काय ?

❖ शिव बाबांना - आत्म्यांचा माता-पिता, बंधु-सखा, तारणहार-सहाय्यक, परमशिक्षक, सद्गुरु, पतितपावन आदि कोणत्या संदर्भात म्हटले जाते ?

❖ आम्हां सर्वांचा पिता-परमपिता परमात्मा शिव आहे. त्यांचेकडून आम्हांस कोणता वारसा-हक्क, जन्मसिध्द अधिकार प्राप्त होतो ?

❖ 'शिव भोलेनाथाचे भंडारे भरपूर - कालकंटक दूर करणारे अथवा अवढर दानी' अशी लोकोक्ति प्रसिध्द आहे. तेंव्हा तो आमचे कालकंटक दूर कसे करतो आणि आमचे भण्डारे भरपूर कधी करतो ?

❖ शिव लिंगावर कळसातील बूंद-बूंद पाणी पडतच असते याचा भावार्थ काय आहे ?

❖ शिव लिंगाचे समोर जो नन्दीबैल प्रस्थापित असतो, ते कोणाचे प्रतिकात्मक रूप आहे ?

❖ शिव लिंगावर तीन पानांचे बेल-पत्र आणि आकची फुले विशेष करुन अर्पण कां करतात ?

❖ 'शिवरात्री'-रात्रीच का बरे साजरी केली जाते ? त्या रात्री जागरण करण्याचे काय कारण असावे ? 'शिवरात्री' महोत्सव साजरा करण्याची वास्तविक विधि कोणती आहे ?

❖ परमधाम, मुक्तिधाम, शांतिधाम, इत्यादि नांवानी संबोधित केलेल्या शिव लोकांतून अर्थात परलोकातून शिव बाबा पृथ्वीवर केव्हां अवतरित होतात आणि जीवात्म्यांना कोणत्या विधिने – 'मुक्ति आणि जीवनमुक्ति' प्रदान करतात ?

❖आपणांस अनुभव आहे कि वर्तमान संकट काळ आहे. – पर्यावरण प्रदूषण, विनाशकारी आण्विक अस्त्र-शस्त्रांचा अनावश्यक साठा, जनसंख्येंत अतिवृध्दि, नैतिक मूल्यांचा ह्रास, भ्रष्टाचार, मानवामध्ये चारित्र्यहीनता इत्यादि दिनोदिन वाढतच आहे. हे सर्व कशाचे द्योतक आहे ? कशा प्रकारच्या प्रलयंकारी संकटमय स्थितीचे सूचक आहे ? त्याचा भावी परिणाम काय होऊ शकतो ? अशा आपत्कालीन स्थितीमध्ये आपणांस अविलंब काय करावयास हवे ? वेळांत-वेळ काढून आपण हे सर्व समजून घ्यावे व ईश्वरानुभूति करुन घ्यावी ही विनम्र विनंती. अज्ञान-अंधकारात रहाणे, हानीकारक नाही काय ?


**अधिक स्पष्टिकरणास्तव तसेच दिव्य अनुभव करण्यासाठी आपणांस स्नेह संपन्न सादर आमंत्रण आहे . ही सेवा नि:शुल्क आहे .**

ईश्वरीय सेवेत,

**आपले आत्मरूपी बंधु-भगिनी, प्रजापिता ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारी**

### तीसरा नेत्र प्रदान करणारा

# त्रिमूर्ति शिव अवतरण सन्देश



**प्रिय आत्मीय बन्धु व भगिनींनो,**

सर्वश्रेष्ठ पर्व ''महाशिवरात्री'' अर्थात् आम्हा सर्व आत्म्यांचे पारलौकिक परमपिता परमात्मा त्रिमूर्ति शिव निराकार यांच्या दिव्य व अलौकिक अवतरणाचा – ''स्मृति दिवस'' होय. सृष्टि चक्र व कल्प पूर्व अनुसार त्यांचे पुन: अवतरण झालेले आहे ही ''शुभ-वार्ता'' ऐकून आपणास हर्ष तर होईलच तसेच आश्चर्य सुद्धा वाटेल! आम्ही आपणास हा शुभ-शिव सन्देश देत आहोत कि ''महाशिवरात्री'' चा वर्तमान वेळेसी आणि आपणा सर्वांच्या जीवनाशी निकटचा सम्बन्ध आहे. एवढेच नव्हे तर महाशिवरात्री चा वृत्तान्त हुबे-हुब पुनरावृत्त होत आहे आणि लवकरच आम्हा सर्वांच्या दु:खाचा अन्त निश्चित होणार आहे.

**महाशिवरात्रीचे रहस्य**

आध्यात्मिक दृष्टिने 'रात्री' शब्द अज्ञान अंधकार व आसुरी लक्षणांचा सूचक आहे. आज जगात चिंता, भय आणि निराशेचे वातावरण आहे. पापाचार, दुराचार, भ्रष्टाचार यांचे थैमान चरम सीमेला पोहोचलेले आहे. मानव मात्र काम-क्रोधादि विकारांच्या अग्नित दग्ध होत आहेत. तर प्राणी मात्र दु:खांने होरपळुन निघत आहेत. तसेच प्राकृतिक आपदा कहर करीत आहेत. आकस्मिक मृत्युचा हृदय विदारक खेळ शुरु आहे.

**श्रीमत भगवत गीतेत वर्णित ''अति धर्मग्लानि'' ची हीच ती वेळ आहे.**

**महाभारी महाविनाशाची दुदुंभी वाजत आहे.**

**शिव अवतरण**

वर्तमान वेळेस कलियुग आणि सत्ययुगाचा संधिकाळ शुरु आहे. हेच ते पुरुषोत्तम बनण्याचे संगमयुग होय. गीतेतील वचनानुसार (यदा यदा हि धर्मस्य...) स्वयं भू, ज्ञान सूर्य, पतित पावन, निराकार शिव परमात्मा पुन: अवतरित झालेले आहेत व सत्ययुगी प्रभात उदयास येत आहे.

## स्वयं भू "शिव" कौण आहेत?



आज भक्तांना विसर पडला आहे कि निराकार ज्योतिस्वरूप शिव परमात्म्यांचे स्मृति चिह्न – "शिव लिंग" आहे. भारत देशात बारा ज्योतिर्लिंग शिव मंदिरे गुणवाचक नावाने प्रसिद्ध आहेत. ती त्यांच्या प्रकाशमय स्वरूपाची द्योतक आहेत. जगभर या स्मृति चिह्नांची पूजा होते.

शिवलिंगावर जी "त्रिपुंडी" बनवितात ती त्रिमूर्ति (त्रिदेव ब्रह्मा, विष्णु आणि शंकराचा रचयिता) त्रिनेत्री (ज्ञानाचा तीसरा नेत्र प्रदान करणारा) त्रिलोकीनाथ, त्रिकालदर्शी असल्याचे दर्शवितात. सूक्ष्माकारी महादेव शंकर सुद्धा निराकार शिव परमात्म्याचे ध्यानमुद्रेत मग्न होऊन तपस्या करतांना दर्शवितात. शिव मंदिराची गोपेश्वर, रामेश्वर, सर्वेश्वर ही नावे सत्यतेचे द्योतक आहेत कि निराकार शिव परमात्माच श्रीकृष्ण आणि श्रीराम यांचे परमप्रिय परमपिता आहेत.

## त्रिमूर्ति शिव परमात्म्याचे दिव्य कर्त्तव्य

करता-करविता परमपिता त्रिमूर्ति शिव परमात्मा वर्तमान पुरुषोत्तम संगमयुगात कल्पपूर्व अनुसार प्रजापिता ब्रह्माद्वारे नवीन सतोप्रधान सृष्टिची पुन: स्थापना करतात. चतुर्भुज विष्णु चे साकार माध्यम श्रीलक्ष्मी-श्रीनारायणा द्वारे सत्ययुगी सतोप्रधान सृष्टिची पालना करवितात. वर्तमान पुरुषोत्तम संगमयुगात प्रजापिता ब्रह्मा यांच्या मानवी वृद्ध शरीरात परकाया प्रवेश करून दिव्य जन्म अर्थात् अवतरीत होऊन गीता ज्ञान व सहज राजयोग शिकवितात. ज्या ज्ञान-योगाने सम्पूर्ण पवित्रता आणि सुख-शान्ति चा जन्म-सिद्ध अधिकार प्राप्त होतो.

हे महान पर्व "महाशिवरात्री" साजरा करण्याची यथार्थ रीति जाणून घ्यावी व भाग्यविधात्या कडुन आपला "मुक्ति-जीवन-मुक्ति" चा जन्म सिद्ध अधिकार प्राप्त करावा. दैवी-स्वराज्य आपला ईश्वरीय जन्म सिद्ध अधिकार आहे. तो आपण प्राप्त करण्यासाठी जवळच्या सेवाकेन्द्रांवर संपर्क करावा.

**प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय**

**मुख्यालय** : आबू पर्वत (राजस्थान)

**स्थानीय सेवाकेन्द्र :**

**(कृपया नि:शुल्क साप्ताहिक पाठ्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा.)**